# जिल्हापरिषद,बीड
# शिक्षणविभाग

जा.क्र.शिक्षण/जिअंबदली//२०२३दिनांक/०१/२०२३ 19 JAN 2023

*अत्यंत महत्वाचे* No - 0202

प्रति,

गटशिक्षणाधिकारी ,
पं.स.सर्व जि.बीड.

**विषय :- प्राथमिक शिक्षक संवर्ग जिल्हातंर्गत बदली सन 2022 मधील संवर्ग-4 साठी प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन प्रणालीवर असणा-या रिक्त जागाबाबत.**

**संदर्भ** :-गटशिक्षणाधिकारी पं.स.गेवराई यांचा अहवाल दि.17/01/2023 व 18/01/2023.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, प्राथमिक शिक्षक संवर्ग जिल्हातंर्गत बदली सन 2022 मधील प्राथमिक शिक्षकांच्या संवर्ग-1 व 2 साठीची बदली प्रक्रीया ऑनलाईन प्रणालीद्वारे पार पडलेली आहे. तसेच दि.21/01/2023 ते 24/01/2023 या कालावधीत संवर्ग-4 साठी म्हणजेच बदलीपात्र शिक्षक कर्मचा-यांच्या बदलीसाठी जागेचे पसंतीक्रम देण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर सुविधा देण्यात येणार आहे.

**त्याअनुषंगाने ऑनलाईन प्रणालीमध्ये गेवराई तालुक्यातील खालील प्राथमिक शिक्षकांच्या जागा रिक्त दिसत आहेत.परंतू प्रत्यक्षात सदरील जागा रिक्त नसून त्याठिकाणी प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. बदली प्रक्रीयेसंबंधी रिक्त पदांची माहिती राज्यस्तरावर कळविल्यानंतर आंतरजिल्हा बदली / प्राथमिक पदवीधरपदी कार्यरत असणारे सहशिक्षक यांच्या समायोजनानंतर झालेल्या पदस्थापनेने भरलेल्या जागांची माहिती ऑनलाईन प्रणालीवर अद्यावत करण्यासाठी तांत्रिक अडचण असल्यामुळे सदर रिक्त असणा-या जागा कार्यरत म्हणून दर्शविता आलेल्या नाहीत. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांनी आपल्या बदलीसाठीचे पसंतीक्रम देतांना खालील जागा रिक्त जागा म्हणून विचारात घेऊ नये व बदलीनंतर संबंधित शिक्षकांची गैरसोय होऊ नये.यासाठी आपल्या तालुक्यातील संवर्ग-4 मधील बदलीपात्र शिक्षकांना ही बाब अवगत करण्यात यावी. याउपरही जर अनावधानाने जर एखाद्या शिक्षकांने खालील दर्शविलेल्या जागांपैकी पसंतीक्रम दिला आणि त्याठिकाणी त्यांची संवर्ग-4 मध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे बदली झाली तर त्या ऑनलाईन जिल्हा अंतर्गत बदली झालेल्या संबंधित शिक्षकास अतिरिक्त समजून त्यांचे समायोजन ऑनलाईन बदली प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर रिक्त असणा-या प्राथमिक शिक्षकांच्या जागेवर करण्यात येईल याबाबतही सर्व संबंधितास अवगत करावे. तसेच सदरील पत्र आपल्या तालुक्यातील सर्व शिक्षकांच्या Whats app ग्रुपवर पाठवावे. जेणेकरुन ही सूचना सर्व संबंधितापर्यंत पोहचणे सोयीस्कर होईल.**

***तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन बदली प्रणालीमध्ये रिक्त दिसणा-या परंतू प्रत्यक्षात रिक्त नसणा-या शाळांची यादी.***

| अ.क्र. | शाळेचे नांव | शाळेचा युडायसक्रमांक | शाळेचे माध्यम | तालुका | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | जि.प.मा.शा.मुलांची गेवराई | 27270500102 | मराठी | गेवराई | |
| 2 | जि.प.प्रा.शा.बागपिंपळगांव | 27270524401 | मराठी | गेवराई | |
| 3 | जि.प.के.प्रा.शा.कन्या उमापुर | 27270508701 | मराठी | गेवराई | सदरील शाळेत ऑनलाईन प्रणालीमध्ये 3 सहशिक्षकांची पद रिक्त दर्शवितात **प्रत्यक्षात 1 पद रिक्त आहे.** |
| 4 | जि.प.प्रा.शा.शेंबडेवस्ती | 27270506803 | मराठी | गेवराई | |
| 5 | जि.प.प्रा.शा.बोरगांवबरड | 27270505701 | मराठी | गेवराई | |
| 6 | जि.प.प्रा.शा.खेर्डा बु. | 27270513001 | मराठी | गेवराई | |
| 7 | जि.प.प्रा.शा.पाडोळ्याचीवाडी | 27270512601 | मराठी | गेवराई | |
| 8 | जि.प.प्रा.शा.पांचाळेश्वर | 27270506501 | मराठी | गेवराई | |
| 9 | जि.प.प्रा.शा.मारफळा | 27270512901 | मराठी | गेवराई | |
| 10. | जि.प.प्रा.शा.अर्धमसलाफाटा | 27270512002 | मराठी | गेवराई | |

19.1.23

**शिक्षणाधिकारी (प्रा.) करिता**
**जिल्हा परिषद,बीड करिता**

**प्रत :-**

मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.